# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


जा.क्र.राकुकका/कक्ष-१२/१४ वर्षे वयोगटातील मुलींकरिता एचपीव्ही लसीकरण / **२६**
दिनांकः ०४ - ०३ -२०२६ ९०७८ - ९१७७

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.. सर्व
जिल्हा शल्य चिकित्सक..जिल्हा रुग्णालय... सर्व
वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका .. सर्व
कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ साऊथ वॉर्ड, मुंबई

**विषय : राज्यातील १४ वर्षे वयोगटातील मुलींकरिता एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना...**
**संदर्भ : केंद्र शासनाचेपत्र क्र. D.O.No.Z.३३०१४/१५/२०२६-IMM दिनांक २५ फेब्रुवारी २०२६**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा राष्ट्रीय शुभारंभ करण्यात आला. याअनुषंगाने, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. श्री प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य व मा. श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, आरोग्य राज्यमंत्री महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्च २०२६ रोजी, महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येणार आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हे, महानगरपालिका व संबंधित आरोग्य संस्थांकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत:

**१. मोहिमेचे धोरण :**

- एचपीव्ही लसीकरण १४ वर्षे वयोगटातील (ज्यांनी १४ वर्षे पूर्ण केलेली आहेत व १५ वर्षे पूर्ण केलेली नाहीत) मुलींना देण्यात येईल. मोहिम सुरू झाल्यानंतर तर पुढील ९० दिवसांच्या कालावधीत १५ वर्षे पूर्ण होणाऱ्या मुली देखील या तीन महिन्यांच्या एचपीव्ही (एचपीव्ही) लसीकरणमोहिमेत लसिकरणास पात्र राहतील.एकूण लोकसंख्येच्या १ % लाभार्थी ही मोहिमेकरीता अपेक्षित लाभार्थी असतील.

- या मोहिमेत Gardasil-४ (Quadrivalent एचपीव्ही Vaccine)ही लस वापरण्यात येणार असून ती +२°C ते +८°C तापमानातILR मध्ये साठविण्यात यावी. सदर लस ०.५ मि.ली. इतक्या प्रमाणात Intramuscularपद्धतीने स्नायूमध्ये डाव्या हाताच्या वरच्या भागात देण्यात येईल. या मोहिमेत लाभार्थींना एकच डोस देण्यात येईल.मोहिमेदरम्यान लसीकरण झाल्यानंतर लाभार्थीच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेन ने खूण करण्यात यावी.
- लसीकरण सत्र शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयोजित करण्यात यावी जसे आयुष्मान आरोग्य मंदिर (प्राथमिक आरोग्य केंद्र/UPHC), ग्रामीण रुग्णालय/UCHC) , उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांचा समावेश राहील. संबंधित संस्थांमध्ये कोल्ड चेन पॉईंट, AEFI व्यवस्थापनासाठी किमान एमबीबीएस (MBBS)पदवी धारण करणारे वैद्यकीय अधिकारी,इंटरनेट, डेस्कटॉप/लॅपटॉप व प्रिंटरची सुविधा उपलब्ध असेल यांची खात्री करावी. जिल्हास्तरावर तयार करण्यात आलेल्या मायक्रोप्लॅननुसार सत्रांचे नियोजन वर नमूद केलेले निकष पूर्ण करणाऱ्या शासकीय संस्थांमध्येच करावे.
- सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत लसीकरण सत्र आयोजित करण्यात यावे व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी किंवा शनिवार-रविवार देखील सत्रे आयोजित करता येतील.. सर्व पात्र लाभार्थ्यांचे तसेच दिलेल्या लसीची नोंद सुद्धा यू-विन(U-WIN) मध्ये करण्यात यावी.
- खालील परिस्थितीत एचपीव्ही लस देण्यात येऊ नये (Exclusion Criteria):
  - मध्यम किंवा तीव्र आजार असलेल्या मुलींना पूर्णपणे बरे होईपर्यंत एचपीव्ही लस दिली जाऊ नये..
  - ज्या मुलींना मागील लसीकरणामुळे ॲलर्जिक रिॲक्शन आली असेल किंवा ज्यांना 'यीस्ट'ची (yeast) ॲलर्जी असेल
  - गर्भावस्था.
  - अपेक्षित वयोगटाबाहेरील मुली.
  - ज्या मुलींनी आधी कोणतीही एचपीव्ही लस (Gardasil/Gardasil-९/Cervarix/Cervavac - एक किंवा अधिक डोस) घेतली असेल, त्यांना मोहिमेदरम्यान लस देण्यात येऊ नये व त्यांच्या लसीकरणाची स्थिती 'यु-विन' (U-WIN) पोर्टलवर अपडेट केली जावी.

२. **AEFI (लसीकरणानंतरचे प्रतिकूल परिणाम) व्यवस्थापन:**

- **लसीकरणापूर्वी:**
  - लसीकरणाच्या वेळी लाभार्थी उपाशी पोटी नसेल याची खात्री पालकांकडून करण्यात यावी. ज्या मुलींनी घरी नाश्ता केलेला नसेल, त्यांच्यासाठी सत्र स्थळी अल्पोपहाराची व्यवस्था करावी.

- लसीकरण करण्याआधी लाभार्थी ला कोणत्या प्रकारचा आजार नसल्याची खात्री करून घ्यावी तदनंतर लसीकरण करण्यात यावे तसेच लसीकरणाच्या आधी त्यांची वैद्यकीय अधिकारी कडून तपासणी करून घेणे.

- **लसीकरणानंतर:**
  - लस घेतल्यानंतर लाभार्थी ३० मिनिटे थांबतील याची खात्री करा.
  - मुलींचे लसीकरणानंतरच्या होणाऱ्या वेदणेपासून लक्ष विचलित करण्यासाठी त्यांना इतर activities मध्ये गुंतवून ठेवणे.
  - लसीकरणाच्या ठिकाणी गर्दी टाळावी.

- एचपीव्ही लस सुरक्षित आहे, परंतु लाभार्थ्याला लसीकरणानंतर सौम्य दुष्परिणाम जाणवू शकतात. बहुतेक दुष्परिणाम दोन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत नाही आणि ते लसीला दिलेल्या रोगप्रतिकारक शक्तीच्या नैसर्गिक प्रतिसादाचा भाग असतात.
- लसीकरणानंतर सामान्य सौम्य प्रतिक्रियाजसे की इंजेक्शनच्या जागी स्थानिक वेदना, लालसरपणा किंवा सूज; ताप, डोकेदुखी, थकवा जाणवणे, मळमळ, चक्कर येणे किंवा लसीकरणानंतर बेशुद्ध पडणे (जे इंजेक्शनच्या भीतीमुळे किंवा रिकाम्या पोटी असल्यामुळे जाणवू शकतात, याचा एचपीव्ही लसीशी संबंध नाही. हे किशोरवयीन मुलांमध्ये अधिक सामान्य आहे).
- इतर नियमित लसींप्रमाणेच, किरकोळ अस्वस्थता जाणवल्यास भरपूर पाणी पिणे, किंवा इंजेक्शनच्या जागी थंड पट्टी ठेवणे, हवेशीर जागी बसणे यासारख्या सोप्या उपाययोजना कराव्यात. त्याचप्रमाणे आवश्यकता असल्यास पॅरासिटामॉल देण्यात यावी.
- लसीकरण सत्राच्या ठिकाणी ॲनाफिलेक्टिक' (anaphylaxis) व्यवस्थापनासाठी किट उपलब्ध असावी .
- लसीकरण सत्राच्या ठिकाणी सर्व एचपीव्ही लसीकरण सत्र स्थळे यु-विन (U-WIN) पोर्टलवर AEFI व्यवस्थापनासाठी जवळच्या २४x७ आरोग्य संस्थेशी जोडलेली असावीत, जेणेकरून पालक संध्याकाळी/रात्री कोणत्याही वैद्यकीय मदतीसाठी संपर्क साधू शकतील. यासाठी जिल्हा/मनपा स्तरावर एक स्वतंत्र संपर्क क्रमांक निश्चीत करावा व नोडल अधिका-याची नियुक्ती करावी. तसेच त्याची व्यापक प्रचार प्रसिध्दी करावी.
- पालक/लाभार्थ्यांच्या एचपीव्ही लसीकरण आणि AEFI व्यवस्थापना बाबतच्या कोणतीही शंकांचे निरसन करण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक १०४ हा निश्चित करण्यात आलेला आहे.
- लसीकरण प्रमाणपत्र, जे यु-विन पोर्टलवरून डाऊनलोड केले जाऊ शकते, त्यावर जवळच्या २४x७ AEFI व्यवस्थापन आरोग्य केंद्राचा पत्ता आणि हेल्पलाईन क्रमांक असेल.

३. **संमती पत्र:** एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक आहे आणि मुलींच्या लसीकरणापूर्वी पालकांची संमती घेणे अनिवार्य राहील. U-WIN पोर्टलवर डिजिटल संमती घेता येईल. इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्यास निर्धारित नमुन्यात हार्ड कॉपीवर संमती घेण्यात यावी.गरज असल्यास लसीकरणानंतर लाभार्थी/पालक/माता/पिता यांना लसीकरण प्रमाणपत्राची हार्ड कॉपी दिली जाऊ शकते.

४. **कालावधी:** ही मोहीम राज्यात एकूण ९० दिवस (तीन महिने) कालावधीत राबविण्यात येईल. मोहिमेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर एचपीव्हीलसीचा समावेश नियमित लसीकरण सत्रांमध्ये करण्यात येईल.

५. **लसीकरण टीम :** प्रत्येक लसीकरण सत्रासाठी ANM / LHV / स्टाफ नर्स / CHO हे लसीकरण अधिकारी म्हणून कार्य करतील. ASHA, अंगणवाडी सेविका किंवा लिंक वर्कर हे मुलीना ने - आण करतील. आरोग्य संस्थेतील कर्मचारी पडताळणी करतील, तसेच स्वयंसेवकांची (फिल्ड मॉनिटर/महिला आरोग्य समिती/जन आरोग्य समिती/आरोग्य कर्मचारी) मदत घेण्यात येईल.

६. **नोंदणी:** लाभार्थी यु-विनवर (U-WIN) स्वतःची नोंदणी करू शकतात किंवा आरोग्य कर्मचाऱ्याच्या मदतीने पूर्व-नोंदणी करून एचपीव्ही लसीकरणासाठी अपॉइंटमेंट घेऊ शकतात किंवा थेट येऊन (Walk-in) डिजिटल यु-विन प्लॅटफॉर्मचा वापर करून जागीच नोंदणी देखील करू शकतात. लाभार्थींची नोंदणी, अहवाल व प्रमाणपत्र देणे ही प्रक्रिया U-WIN डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात यावी.

७. **e-VIN प्रणाली:** लसीचा साठा व वितरण e-VIN प्रणालीद्वारे व्यवस्थापित करण्यात यावा.

८. **इतर विभागाचे सहभाग:** मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, पंचायत राज संस्था तसेच इतर संबंधित विभागांशी समन्वय साधावा. तसेच वैद्यकीय व व्यावसायिक संघटनाFOGSI, IMA, IAP, लायन्स क्लब/रोटरी आणि कॅन्सर सोसायट्यांसारख्या व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने जनजागृती करण्यात यावी.

९. **प्रशिक्षण:** दिनांक ५ मार्च २०२६ पर्यंत सर्व जिल्हे व महानगरपालिका यांनी आपल्या अधीनस्त लसिकरणा संबंधित अधिकाऱ्यांचे व सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एचपीव्हीलसीकरण मोहिमेसंबंधीचे प्रशिक्षण प्रत्यक्ष अथवा व्ही सी द्वारे आयोजित करण्यात यावे.

१०. **कृतीदल बैठक :** जिल्हा व महानगरपालिका यांनी एचपीव्हीलसीकरण मोहिमेसंबंधी दिनांक ६ मार्च २०२६ पर्यन्त जिल्हा व महानगरपालिका कृतीदलाच्या (DTFI/CTFI) बैठक आयोजित करण्यात याव्यात.

११. **अहवाल:** एचपीव्हीलसीकरण मोहिमेच्या देखरेखीसाठी व मूल्यमापनासाठी मंडळ, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर आवश्यक पर्यवेक्षकीय आदेश जारी करावेत. तसेच, मोहिमेच्या समन्वयासाठी प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात यावी.

१२. **नियंत्रण कक्ष व रॅपिड रेस्पॉन्स टीम :** एचपीव्ही लसीकरण मोहिमेचे नियोजन, समन्वय, देखरेख व तात्काळ समस्या निवारण करणे करीत आपल्या स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करावे तसेच एचपीव्ही लसीकरण मोहिमेदरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती (Emergency) उद्भवल्यास तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देण्यासाठीरॅपिड रेस्पॉन्स टीम (Rapid Response Team RRT) कार्यरत असावे. लसीकरण मोहिमेदरम्यान उपसंचालक स्तरावरुन देखील नियंत्रण कक्ष स्थापन करून मोहिमेचे नियंत्रण करण्यात यावे. परिमंडळ स्तरावरुन मोहीम कालावधीत नियंत्रण ठेवणेसाठी प्रत्येक जिल्ह्यास नोडल अधिकारी नियुक्त करण्यात यावेत. Rapid ResponseTeam तयार करून AEFI चे देखील व्यवस्थापन नियमित होईल याची दक्षता घ्यावी .

१३. सदर मोहिमेसाठी नियमित लसीकरण कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा तसेच या कार्यक्रमातील उपलब्ध निधीचा वापर करण्यात यावा.

एचपीव्ही लसीकरण मोहिमेचे नियोजन व अंमलबजावणी करीता वरील सर्व मार्गदर्शक सूचनाचे काटेकोरपणे पालन करावे, व प्रभावीपणे मोहीम राबविण्यात यावी.

4/3/2026

(डॉ. कादंबरी बलकवडे भा.प्र.से.)
आयुक्त आरोग्य सेवा तथा
संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
मुंबई

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहिस्तव:

१. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडल, सर्व
२. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१. मा.प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र
२. मा.सचिव २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र
३. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. मा. संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई